आजचा दिनविशेष
१९७९ : मदर तेरेसा यांना शांततेचा नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com
LOK AARAMBH
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र | वर्ष ३ रे | शुक्रवार १७ ऑक्टोबर २०२५ | अंक २९५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु




# बीडमध्ये ओबीसींची महाएल्गार सभा, जरांगे पाटील संतापले, म्हणाले कोणीही उठतं आणि बीड मध्ये येतं !

बीडमध्ये राज्यातील समस्त ओबीसींची एक महाएल्गार सभा होणार आहे. या सभेला राज्यभरातील ओबीसी समाज हजेरी लावणार आहे. ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी 17 ऑक्टोबर रोजी ही महासभा पार पडणार आहे. या सभेला राज्यातील अनेक महत्त्वाचे ओबीसी नेतेही हजेरी लावणार आहेत. मंत्री छगन भुजबळ यांच्या नेतृत्त्वात ही सभा आयोजित करण्यात आली आहे. दरम्यान, याच सभेवर मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांनी यांनी प्रतिक्रिया दिली आहे. अलिबाबाच्या आहारी गेलेल्या ओबीसी नेत्यांनी आता माकडचाळे बंद केले पाहिजेत, असा थेट सल्ला जरांगे यांनी दिला आहे. भुजबळ यांच्या नेतृत्त्वात होणार सभा

भुजबळ यांच्या नेतृत्त्वात बीडमधील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण परिसरात ही महाएल्गार सभा होईल. या सभेला माजी मंत्री धनंजय मुंडे हेदेखील उपस्थित असणार आहेत. भुजबळ यांच्या नेतृत्त्वात ही सभा होणार असल्याने जरांगे चांगलेच आक्रमक झाले आहेत. त्यांनी भुजबळ यांना येवल्याचा अलिबाबा असे म्हणत हिणवले आहे. खूप चांगले असणारे नेतेसुद्धा येवल्याच्या अलिबाबाच्या आहारी गेले आहेत. त्याच्या षड्यंत्रात हे नेते गुंतलेले आहेत. या नेत्यांना




येवल्याचा अलिबाबा काही बाहेर पडू देत नाही, असा हल्लाबोल जरांगे यांनी केला. येवल्याच्या अलिबाबाचे अनेक प्रयोग

तसेच, काही नेत्यांना हाताशी धरून येवल्याच्या अलिबाबाचे काही प्रयोग सुरू आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर दबाव आणणे, हैदराबादच्या जीआरच्या

## बीड जिल्ह्याला जातीयवादाचा आखाडा बनवलं

छगन भुजबळ हे सगळ्यांचा वापर करून घेत आहेत. भ्रष्टाचाराच्या माध्यमातून ते पैसे कमवत आहेत. ओबीसी नेत्यांना हाताखाली धरून हे सगळं चालू आहे. यांनी बीड जिल्ह्याला जातीयवादाचा आखाडा बनवलेलं आहे. कुणीही उठतो आणि त्याच ठिकाणी येत आहे. सांगली आणि सातारा जिल्ह्यातील लोकसुद्धा तिथेच येता आहेत, अशी टीकाही जरांगे यांनी यावेळी केली.

आडून लपून राहायचं, मराठा समाजाच्या आरक्षणासाठी जो जीआर काढला आहे, तो रद्द करायला सांगणे, अशी कामे केली जात आहे, असा आरोपही जरांगे यांनी केला. अलिबाबाने तसेच त्याच्या आहारी गेलेल्या नेत्यांनी आता माकडचाळे बंद करावेत, असा सल्लाही यावेळी जरांगे यांनी दिला.

भुजबळ नेमकी काय प्रतिक्रिया देणार? दरम्यान, आता जरांगे यांच्या या टीकेनंतर ओबीसी समाजातील नेतेदेखील आक्रमक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आगामी ओबीसींच्या महाएल्गार सभेत नेमके काय होणार? जरांगे यांना प्रत्युत्तर दिले जाणार का?हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# रिपब्लिकन सेना बीड जिल्हा उपाध्यक्ष पदी ॲड. नंदकिशोर खळगे यांची निवड

माजलगाव : (प्रतिनिधी) रिपब्लिकन सेना बीड जिल्हा अध्यक्ष विजय साळवे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक १४ रोजी माजलगाव येथील व्यंकटेश हॉटेलमध्ये विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत पक्ष संघटनात्मक कामाचा आढावा घेऊन विविध पदांवर नवीन नियुक्त्या करण्यात आल्या. या प्रसंगी ॲड. नंदकिशोर खळगे यांची बीड जिल्हा उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच सरवर पिंपळगाव येथील डि.एल. भालेराव, ज्ञानेश्वर देवकुळे आणि



प्रितम भालेराव यांनी रिपब्लिकन सेनेत प्रवेश केला. याच बैठकीत मोकिंदा खरात यांची केसापुरी सर्कल प्रमुख म्हणून निवड करण्यात आली. बैठकीचे आयोजन तालुकाध्यक्ष वशिष्ठ लांडगे, उपाध्यक्ष सुरेश साळवे आणि वैजनाथ गडसिंग यांनी केले होते. या वेळी जिल्हाध्यक्ष विजय साळवे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पक्षाची भूमिका स्पष्ट करत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. या बैठकीला तालुका संघटक विश्वनाथ तोकडे अध्यक्षस्थानी होते. तसेच विलास गायसमुद्रे, चंद्रकांत टाकणखार, संतोष खुणे, ओमप्रकाश टाकणखार, अर्शद शेख, राहूल सिरसट, साहेबराव टाकणखार, विलास ठोंबरे, अन्वर सय्यद, राजेश टाकणखार, शेळके आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीत पक्षविस्तार आणि आगामी निवडणुकांसाठी रणनिती आखण्यात आली.

# अहिल्यादेवी विकास ट्रस्ट कराड, वतीने सायली ढेबे यांना पुरस्कार प्रदान

बीड प्रतिनिधी अहिल्यादेवी सामाजिक व शैक्षणिक विकास ट्रस्ट कराड वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रीशताब्दी जयंती निमित्ताने गुणवंत विद्यार्थी पुरस्कार मा. कु. सायली बाळू ढेबे,मुळशी पुणे यांना देण्यात आला. त्यांचे सामाजिक क्षेत्र, कलाक्षेत्र, पत्रकारिता, तसेच शैक्षणिक क्षेत्रात बी. ए. इन सायकॉलॉजी पदवी प्राप्त, बॅचलर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन इन कम्प्युटर एप्लीकेशन तसेच आत्ता शिक्षण घेत असलेल्या फिजिओथेरपी क्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेत हा पुरस्कार मा. श्री. प्रवीण काकडे ( संस्थापक अध्यक्ष, अहिल्यादेवी सामाजिक व शैक्षणिक विकास ट्रस्ट कराड) यांच्या अध्यक्षतेखाली देण्यात आला.

या पुरस्कारा दरम्यान प्रमुख अतिथी लाभले होते. मा. डॉ. अशोक गुजर, मा. राजेंद्र अण्णासाहेब डांगे, मा. सचिन बुरुंगले तसेच मा. डॉ. इंद्रजीत यशवंतराव मोहिते, श्री. उल्हास वाघमोडे, मा. श्री. विश्वासराव मोरे पाटील, श्री. डॉ. भरत बल्लाळ, मा. धोंडीराम जाधव, प्रा. डॉ. मच्छिंद्र गोफणे, प्रा. श्री. रवींद्र कोकरे, प्रा. साहेबराव चौरे ह्या प्रमुख मान्यवरांची उपस्थिती लाभली होती यांच्या उपस्थितीत हा सोहळा पार पडला.



# जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

## कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही,

बीड, दि,16 :- बीड जिल्हयात कायदा व सुव्यस्थेबाबत आगामी काळात दि. 15 ऑक्टोबर रोजी राष्ट्र परिवर्तन मोर्चा व राज्य परिवहन महामंडळ बीड यांचा मुंबई येथे होणा-या आत्मक्लेश आंदोलनास पाठींबा तसेच आरक्षणाच्या अनुषंगाने विविध संघटनाकडून मोर्चा, सभा आयोजित करण्यात येत आहे. आगामी काळात दिवाळी सण साजरा होणार आहे. तसेच राजकिय पक्ष संघटनेच्या वतीने न्याय मागण्यासाठी विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक 15 आक्टोबर 2025 रोजीचे 00.01 वाजेपासून ते दि. 29 ऑक्टोबर 2025 रोजीचे 24.00 वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा 37 (1) (3) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम 37 (1) (3 ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.

या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.

कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय 15 दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# राज्यातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे ऑक्टोंबर महिन्याचे वेतन दिवाळीपूर्वी करा - खंडेराव जगदाळे

बीड दि.16(प्रतिनिधी)- राज्यातील सर्व शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे ऑक्टोंबर महिन्याचे वेतन दिवाळीपूर्वी करावे अशी मागणी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे दुसरे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली.

या निवेदनात महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे सर म्हणतात की, संपूर्ण देशात आणि महाराष्ट्र राज्यात दिवाळी सण मोठ्या आनंदात आणि उत्साहात साजरा केला जातो. दरवर्षी दिवाळी सणाच्या निमित्ताने राज्यातील सर्व शासकीय निमशासकीय कर्मचाऱ्यांचे ऑक्टोंबर महिन्याचे नियमित वेतन हे दिवाळी सणाच्या पूर्वी केले जाते. परंतु आता दिवाळीचा



सण सुरू होण्यासाठी अवघे काही तास शिल्लक असतानाही अद्याप राज्यातील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे वेतन झाले नाहीत. शासनाने ज्या प्रमाणे गौरी गणपती सणाला राज्यातील सर्व कर्मचाऱ्यांचे वेतन लवकर दिले होते. त्याच प्रमाणे दिवाळी सणाच्या औचित्य साधून सर्वसामान्य शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे ऑक्टोंबर महिन्याचे वेतन दिवाळीपूर्वी करून सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर



कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड करावी अशी मागणी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष खंडेराव जगदाळे सर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दुसरे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांना दिलेल्या निवेदनाद्वारे केली. दरम्यान आता शासन काय निर्णय घेते याकडे राज्यातील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# अवैध वाळू वाहतूक करणारा टिप्पर पोलिसांच्या ताब्यात



बीड, दि. 16 ऑक्टोबर आज रोजी बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परवर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. पोलिसांनी एका टिप्परमधून तब्बल पाच ब्रास इतकी वाळू जप्त केली असून या कारवाईत एकूण ₹25 लाख 25 हजार किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. सदर टिप्पर चालकाचे नाव शिराज सालार शेख (वय 35 वर्षे, रा. तैयब नगर, गेवराई) असे असून, वाहनाचा मालक विपुल मस्के (रा. पालवण, ता. जि. बीड) असा आहे. या दोघांविरुद्ध बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर ,उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विकास राठोड, पोलीस अंमलदार अश्फाक सय्यद, मनोज परजणे व नितीन वडमारे यांनी केली.

# वाहकास खाकी गणवेशात ड्युटीवर मारहाण गुन्हा दाखल एसटी महामंडळाच्या वाहकास मारहाण शासकीय कामात अडथळा !

## माजलगाव नविन बसस्थानक येथिल घडली घटना

माजलगाव प्रतिनिधी दिनांक 15/10/2025 वार बुधवार फिर्यादी सिंकदर इब्राहिमखॉ तडवी पठाण वय 46 वर्षे व्यवसाय एस टी वाहक नंबर 36345 आगर माजलगाव रा लुखेगाव ता माजलगाव जि बीड येथील रहिवासी असून प्रवासी शेख मुहमद यांनी मारहाण करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला या प्रकरणी समक्ष पोलीस स्टेशन येथे हजर येवुन तोंडी सांगुन फिर्याद देतो की मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मी 2019 पासुन एसटी महामंडाळामध्ये चालक तथा वाहक म्हणुन नौकरीस आहे. माजलगाव आगार येथे मागील 10 महिण्यापासुन एसटी वाहक तथा चालक म्हणुन नेमणुक आहे.दिनांक 15/10/2025 रोजी एसटी क्रमांक एम एच 20 बीएल 2557 ही एस टी बस सोबत चालक भगवान श्रीराम शिंदे चालक नंबर 1160 आसे आम्ही माजलगाव ते जदिद जवळा दुपारी 04.00 वाजता माजलगाव येथुन निघुन 05.00 वाजता जदिद जवळा येथे पोहचलोत लागलीच 05.05 मिनीटाने जदिद जवळा येथुन निघालात आमच्या बस मध्ये प्रवाशी अरोपी नामे शेख मुहमद शेख इब्राहिम रा अरफात मोहल्ला माजलगाव हा व त्याच्या सोबत एक ईसम असे दोघे बसले होते. त्यांनी दोन तिकीटासाठी मला 500 रुपयाची नोट दिली असता मी त्याला प्रति एक प्रवाशास 36 रू प्रमाणे 72 रुपयाचे तिकीट व नगदी 420 रुपये परत दिले व आमची बस माजलगाव नविन बसस्थानक येथे 06.00 वाजता पोहचलो मी बसच्या खाली उतरलो असता प्रवाशी आरोपी शेख मुहमद शेख इब्राहिम हा मला राहिलेले आठ रुपये मागण्यासाठी आला असता त्यास मी म्हणालो मला दोन रुपये दे मी तुला दहा रुपये देतो असे म्हणालो असता त्यावर आरोपी शेख मुहमद शेख इब्राहिम हा मला म्हणाला की तु माझा नौकर आहेस तु मला पैसे आणुन दे आसे म्हणाला मी खाकी गणवेशात ड्युटीवर असताना त्याने माझी शर्टची गचुरी पकडुन माझे तोंडावर हाताच्या बुक्याने मारुन शिवीगाळ करुन मला खाली पाडुन मुक्कामार देवुन प्रवाशी आरोपी नामे शेख मुहमद शेख इब्राहिम याने मी एसटी महामंडळ येथील सरकारी काम करित असताना माझे कामात अडथळा आणुन मला शिवीगाळ करुन हाताने तोंडावर मारुन मुक्कामार दिला म्हणुन आरोपी शेख मुहमद शेख इब्राहिम रा अरफात मोहल्ला माजलगाव याचे विरुद्ध गुन्हा प्रथम खबर क्रमांक 0373, कलम,भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023, 132, 115, 352, गुन्हा शहर पोलीस स्टेशन माजलगाव येथे दाखल पुढील तपास संदीप मोरे हेड कॉन्स्टेबल हे करत आहे

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
शुक्रवार १७ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



संपादकीय

## चांदीचा भाव थेट अडीच लाख होणार? वर्षभरात पोहोचणार थेट...

### एका वर्षात चांदीचा भाव किती होणार?



सध्या सोने आणि चांदीच्या दरात चांगलीच वाढ होताना पाहायला मिळत आहे. बाजार खुला झाला की हे दोन्ही मौल्यवान धातूंची किंमत वधारत आहे. चांदीचा भाव तर सोन्यापेक्षाही अधिक वेगाने वाढताना पाहायला मिळत आहे. त्यामुळेच चांदीमधील तेजी पाहून गुंतवणूकदार आपला मोर्चा चांदीकडे वाळवत आहेत. दरम्यान, सध्या सोने आणि चांदीमध्ये तेजी असली तरी भविष्यात हा कल कायम असेल का? असा प्रश्न विचारला जात आहे. याच प्रश्नाचे उत्तर काही तज्ज्ञांनी दिले आहे. या अंदाजानुसार आगामी वर्षात चांदी एका ऐतिहासिक उच्चांकावर पोहोचणार असून गुंतवणूकदार मालामाल होण्याची शक्यता आहे.

नेमकी काय माहिती समोर आली आहे?

तज्ज्ञांच्या मते आगामी काळात चांदीचा भाव चांगलाच वाढणार आहे. येणाऱ्या आर्थिक वर्षात तर कोणी कल्पनाही केली नसेल, एवढा चांदीचा भाव वाढणार आहे. मोतीलाल ओस्वाल फायनॅन्शियल सर्व्हिसेसने (MOFSL) 'सिल्व्हर 2030- अभूतपूर्व वाढ' नावाचा एक रिपोर्ट तयार केला आहे. या रिपोर्टनुसार चांदी दीर्घकालीन तेजीच्या काळातून जात आहे. 2027 सालात चांदीची किंमत सध्याच्या तुलनेत 50 टक्क्यांनी वाढण्याची शक्यता आहे. म्हणजेच चांदी सध्याच्या 51 डॉलर्स प्रति औंसच्या तुलनेत 75 ते 77 डॉलर्स प्रति औंसपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. भारतीय रुपयाच्या हिशोबाने अभ्यास करायचा झाल्यास सोने आगामी वर्षात तब्बल 2045 लाख रुपयांवर पोहोचू शकते. गुंतवणूक केल्यास फायदा होणार का? रतीयांसाठी सध्या सोन्यात गुंतवणूक करणे फायदेशीर ठरू शकते, असे सांगितले जात आहे. MOFSL च्या म्हणण्यानुसार आर्थिक वर्ष 2026-2027 मध्ये चांदी 2,45,000 रुपये प्रति किलोपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. म्हणजेच सध्या सोन्यात गुंतवणूक केली तर आगामी वर्षभरात तुम्हाला फायदा होऊ शकतो. आजकाल चांदीच्या मागणीत वाढ झाली आहे. फक्त दागिने वगळता उद्योग, इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात चांदी या धातूचा वापर वाढतो आहे. त्यामुळेच भारतातील चांदीचे ईटीएफदेखील चांगली कामगिरी करत आहे. गुंतवणूकदारांना चांगले रिटर्न्स मिळाले आहेत. चांदीच्या ईटीएफमध्ये गुंतवणूक गुंतवणूक करण्याचे प्रमाणही वाढले आहे. ऑगस्ट 2025 मध्ये चांदी ईटीएफमधील गुंतवणूक 180 टक्क्यांनी वाढली आहे. (टीप- वरच्या लेखात दिलेली माहिती ही प्राथमिक स्वरुपाची आहे. कुठेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष गुंतवणूक करायची असेल किंवा कोणताही आर्थिक निर्णय घ्यायचा असेल तर त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचा सल्ला जरूर घ्या)

# अनैतिक संबंधांत गुरफटली, नवऱ्याला थेट नदीत फेकलं,

पती-पत्नीचं नातं हे विश्वासावर टिकलेलं असतं. एकमेकांवर विश्वास ठेवून आयुष्याच्या शेवटपर्यंत साथ द्यायची असते. म्हणूनच हे नातं अत्यंत पवित्र मानलं जातं. पण या सर्व धारणांना छेद देणारा नांदेड जिल्ह्यातील एक धक्कादयक आणि क्रूर प्रकार समोर आलेला आहे. अनैतिक संबंधांत अडथळा ठरणाऱ्या पतीला एका महिलीने आपल्या प्रियकराच्या मदतीने संपवले आहे. विशेष म्हणजे नवऱ्याला संपवण्यासाठी तिने त्याला जिंवत असताना नदीत फेकून दिले आहे. कॉल रेकॉर्डींगमुळे खुनाच्या दीड महिन्यांनी हा उलगडा झाला आहे. या घटनेनंतर आता सर्वत्र खळबळ उडाली असून संताप व्यक्त केला जातोय. आरोपी महिलेचे नाव प्रियांका असे आहे.नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यात प्रियकराच्या मदतीने पत्नीने पतीचा खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. तब्बल दीड महिन्यांच्या तपासानंतर पोलिसांनी या रहस्याचा उलगडा केला. अनैतिक संबंधात अडथळा ठरणाऱ्या पतीला पत्नीने प्रियकराच्या मदतीने दारूच्या नशेत पैनगंगा नदीच्या पुलावरून जिवंत फेकून दिलं होतं. अखेर मोबाईल कॉल रेकॉर्ड आणि तपासाच्या आधारे पोलिसांनी पत्नी प्रियंका भगत आणि तिचा प्रियकर शेख रफीक यांना अटक करून या खुनाचा छडा लावला. या अनैतिक प्रेमप्रकरणात मात्र पती किशन भगत याचा बळी गेला आहे.पोलिसांनी खुनाचा उलगडा कसा केला?




या प्रकरणाबद्दल पोलिसांनी सविस्तर माहिती दिली आहे. मयत किशन भगत यांचा अनैतिक संबंधातून खून झाल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे. यात बायको आणि प्रियकर सहभागी आहेत. २९ ऑगस्ट रोजी मयत किशन भगत गायब असल्याची तक्रार आली होती. किशन भगत यांची बायको प्रियांका भगत यांनीच ही तक्रार दिली होती. दाखल तक्रारीनुसार पोलिसांनी आपल्या तपासाला सुरुवात केला होती. यादरम्यान यवतमाळ जिल्ह्यातील महागाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत पैनगंगा नदीत अनोळखी मृतदेह आढळून आला होता. पुढे हा मृतदेह किशन भगत यांचा असल्याचे समोर आले. पोलिसांनी आपला तपास चालूच ठेवला होता. परिणामी या खुनाचे धागेदोरे किशन भगत यांची पत्नी आणि तिच्या प्रियकरापर्यंत पोहोचले. आता या दोघांनाही अटक करण्यात आले असून पोलीस पुढील कारवाई करत आहेत.

# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते अमृत दुर्गोत्सव २०२५ चा शुभारंभ
## महाराष्ट्रात अमृततर्फे दीपावलीमध्ये होणार विश्वविक्रमी दुर्गोत्सव

बीड दि. 16 :- महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत), पुणे यांच्या वतीने राज्यभर "दुर्गोत्सव २०२५" या भव्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, या उपक्रमाचा बीड जिल्हा स्तरावरील शुभारंभ जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते आज संपन्न झाला. या प्रसंगी अमृत संस्थेचे जिल्हा व्यवस्थापक विशाल जोशी उपस्थित होते.

या उपक्रमाचा प्रमुख उद्देश म्हणजे महाराष्ट्रातील नागरिकांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अभिमानाची भावना वृद्धिंगत करणे आणि युनेस्कोने नुकतेच जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट केलेल्या 12 ऐतिहासिक गड-दुर्गांच्या माध्यमातून स्वराज्याची परंपरा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शुभारंभ प्रसंगी नागरिकांना आवाहन केले की, > "बीड जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या घराच्या अंगणात किंवा सोसायटी परिसरात गड-दुर्गांच्या प्रतिकृती साकारून दुर्गोत्सवात सहभागी व्हावे.यामधून शिवचरित्राचा अभिमान प्रत्येकाच्या मनात सखोलपणे रुजेल.

दुर्गोत्सव 2025 — उपक्रमाचे वैशिष्ट्ये : अमृत संस्थेच्या वतीने या राज्यव्यापी उपक्रमांतर्गत नागरिकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आपल्या घरात,शाळा, कार्यालय किंवा सार्वजनिक ठिकाणी महाराष्ट्रातील 12 गड-दुर्गांपैकी कोणत्याही एका दुर्गाची प्रतिकृती तयार करावी आणि त्या प्रतिकृतीसह घेतलेला सेल्फी www.durgotsav.com या संकेतस्थळावर अपलोड करावा.

या उपक्रमात सहभागी झालेल्या सर्वांना मुख्यमंत्री महोदयांच्या स्वाक्षरीचे अभिनंदनपत्र पाठवण्यात येईल.तसेच अमृत विद्या या डिजिटल लर्निंग प्लॅटफॉर्मवरील "शिवछत्रपतींचा गौरवशाली इतिहास आणि आजच्या काळातील प्रेरणा" या विषयावरील रु. 999/- किंमतीचे ऑनलाइन प्रशिक्षण सर्व सहभागींसाठी निशुल्क उपलब्ध करून दिले जाणार आहे.

12 गड-दुर्गांची यादी :

रायगड,राजगड,प्रतापगड,सिंधुदुर्ग,साल्हेरदुर्ग, खांदेरीचा दुर्ग,जिंजी,पन्हाळगड,शिवनेरी,विजय दुर्ग,लोहगड आणि पद्मदुर्ग (सुवर्णदुर्ग)."गड-दुर्ग हे आपल्या स्वाभिमानाचे प्रतीक आहेत. प्रत्येक कुटुंबाने या उपक्रमात सहभागी होऊन शिवरायांना अनोखी मानवंदना द्यावी," असे प्रतिपादन अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी केले आहे.

# यशोधरा बुद्धविहार फुलेनगर येथे वर्षावास समारोप कार्यक्रम उत्साहात पार पडला.

माजलगाव (वार्ताहर) : यशोधरा बुद्धविहार, फुलेनगर माजलगाव (ता. माजलगाव, जि. बीड) यांच्या वतीने वर्षावास समारोपाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात तथागत भगवान गौतम बुद्ध व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दिव्य अशा मूर्तींचे पूजन पूजनीय भंते पिंडोल व घाडगे परिवार यांच्या हस्ते पार पडले. भंतेना क्षमा याचना करण्यात आली व त्रिशरणं-पंचशील सर्वांना देण्यात आले. त्यानंतर भंते पिंडोल यांना चिवरदान व धम्मदान यशोधरा बुद्धविहाराच्या वतीने करण्यात आले. यशोधरा बुद्ध विहार येथे गेले 4 महिन्यापासून आषाढ पौर्णिमा ते आश्विन पौर्णिमा डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित "भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म" या पवित्र धम्मग्रंथ वाचन सुरु होते.त्याचा आज समारोप करण्यात आला. कार्यक्रमात पूजनीय भंते पिंडोल यांनी आपल्या प्रेरणादायी धम्मदेशनेत या



ग्रंथातील प्रतिज्ञा व त्यांचे महत्त्व सर्वांना समजावून सांगितले. त्यांनी सांगितले की, आपल्या जीवनात पंचशील, अष्टशील व दहा पारमिता यांचे पालन करणे हेच खऱ्या अर्थाने धम्मानुसार जगणे होय. तसेच ध्यानधारणेचे महत्त्व, न्याय, समता आणि मानवतेचा मार्ग यांवर त्यांनी सखोल विचार मांडले.

#भंते_पिंडोल_म्हणाले —

"बुद्धधम्म हा मानवमुक्तीचा मार्ग आहे. तो तर्क, करुणा आणि समतेवर आधारलेला आहे. धम्म म्हणजे माणसाला माणूस बनवणारा हा मार्ग होय." त्यांनी ज्ञानप्राप्ती, ग्रहत्याग, बोधिप्राप्ती, धम्मप्रचार, संघरचना आणि बुद्धाचा उपदेश ते महापरिनिर्वाण या सर्व टप्प्यांवर सविस्तर विवेचन करताना नमूद केले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हा ग्रंथ अत्यंत मेहनतीने आणि मानवमुक्तीच्या दृष्टिकोनातून लिहिला आहे. या कार्यक्रमासाठी माजलगाव व परिसरातील बौद्ध उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी यशोधरा बुद्धविहाराच्या उपाध्यक्षा आयु. सुशीलाताई चांदमारे, कमलताई डोंगरे, वेणूताई माने, बोराडे ताई, महानंदा जावळे, सिताबाई जाधव, केशरबाई राऊत, शिवशाला निसर्गध, सत्वशिला सोनपसारे, मगरेताई, मस्केताई, सीताबाई खळगे, कुमुदिनीताई जावळे, सुनिताताई टाकणखार व इतर महिलांनी ग्रंथ श्रवण केले, नियोजन केले व अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन यशोधरा बुद्धविहाराचे सचिव बाबासाहेब जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुनिता भिमराव टाकणखार यांनी मानले. भोजनदानाचे आयोजन आयु. महानंदाताई भास्करराव घाडगे (माजलगाव) यांनी केले होते. त्यांनी स्वादिष्ट भोजन देऊन पुण्य संपादित केले. कार्यक्रमाचा समारोप बुद्धवचनाने करण्यात आला "सब्ब पापस्स अकरणं, कुशलस्स उपसम्पदा, सचित्त परियोदपनं, एतं बुद्धानं सासनं."

# चकलांबा जि प मा गटातून परमेश्वर वाघमोडे नावाची चर्चा

## चकलंबा जि, प, गटातुन परमेश्वर वाघमोडे निवडणूक लढवण्याची निर्धार!

चकलंबा प्रतिनिधी :- गेवराई तालुक्यातील चकलंबा जिल्हा परिषद गटातुन परमेश्वर महाराज वाघमोडे सर यांनी निवडणूक लढविण्याचा निर्धार केला असुन, सतत जनतेत असणारा नेता अशी त्यांची ओळख आहे, राजकारणा बरोबरच समाजकारण अशी त्यांची विचार धारा असुन, अनेकांना संकट काळी देवदुता प्रमाणी धावुन जाण्याची धमक त्यांच्या आहे,

गेवराई तालुक्यातील अत्यंत महत्वाचा समजला जाणारा चकलंबा जिल्हा परिषद गट हा जिल्हा परिषदीचे नांदी ठरला आहे, अहमद नगर जिल्हाच्या सरहद्दी लगद असणारा चकलंबा सर्कलआहे, सर्व जाती धर्माचे लोक या गटात राहाते, जिवाला जिव देणारे देव माणसे येथेच अशी अगळी वेगळी रचना असणाऱ्या चकलंबा जि, प, गटात सर्वसामान्य लोंकाचा चेहरा असणारे परमेश्वर वाघमोडे यांनी या गटातुन ठामपणे उभा राहण्याची निर्धार केला आहे, या भागात समाजकार्य बरोबरचं पिडीत असाह्याना मदत करणे हा त्यांचा जन्म जात पिंड त्यांनी सतत गोरगरीब यांना रुग्ण सेवासह अनेकांना सढळ होतानी मदत करत या भागातील अनेक जणाचे संसार घडविण्याची काम प्रमाणिक पणे काम केले आहे, त्यांच्या कार्याची पावती म्हणून मिनी मंत्रालय जि, प, मध्ये ते इनटरी करणार आहेत. त्यांना चकलंबा गटातुन भरमसाठ मतदान रुपी आशिर्वाद मिळणार आहेत. यात मात्र शंकाच नाही मोठ्या लोकाला खूप निवडून दिले

### जनता माझ्या पाठीशी


जनतेने मला संधी द्यावी मी चकलांबा सर्कलचा कायापलट करीलअसे पत्रकाराला बोलताना वाघमोडे साहेब म्हणाले चकलंबा जि, प, गटातुन परमेश्वर वाघमोडे निवडणूक लढवण्याची निर्धार! सर्वसामान्याचा कामी येणारा नेता अशी त्यांची ओळख




तरी मायबाप जनतेने माझ्यासारख्या सामान्य माणसाला आपली सेवा करायची संधी द्यावी ही व मला मतदान रुपी दान व आशीर्वाद द्यावे त्यांना विनंती आपला महाराज परमेश्वर वाघमोडे



## सायलेंट हार्ट अटॅक म्हणजे काय?



हार्ट अटॅक ही एक जीवघेणी आरोग्य स्थिती आहे. कारण कधी आणि कोणत्या कारणांनी हार्ट अटॅक येईल काही सांगता येत नाही. काही लक्षणे अशी असतात की त्यावरून आपण हे जाणू शकतो की हार्ट अटॅक असू शकतो आणि अलर्ट होऊन लगेच डॉक्टरांशी संपर्क करू शकतो किंवा हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होऊ शकतो. पण काहीवेळेला हार्ट अटॅक येण्याची परिस्थिती लक्षात येत नाही. अशी स्थिती खरंच जीवघेणी ठरू शकते. त्यालाच एकप्रकारे सायलेंट हार्ट अटॅक म्हणतात. सायलेंट हार्ट अटॅकची लक्षणे नावाप्रमाणेच, सायलेंट हार्ट अटॅक म्हणजे हृदयविकाराचा झटका ज्याची कल्पना करता येत नाही. म्हणूनच लोक सहसा त्याकडे दुर्लक्ष करतात, ते सामान्य थकवा, गॅस किंवा स्नायू दुखणे आहे असे समजून दुर्लक्ष करतात. त्यामुळे त्याचा थेट परिणाम हृदयावर होतो. हा सायलेंट हार्ट अटॅक असूनही, यामुळे हृदयाच्या स्नायूंचे गंभीर नुकसान होते. सायलेंट हार्ट अटॅकची लक्षणे सामान्य हार्ट अटॅकपेक्षा कमी असतात. सायलेंट हार्ट अटॅकमध्ये तीव्र छातीत दुखणे, हात किंवा खांदे दुखणे यांसारखी लक्षणे फारशी दिसत नाहीत.त्यामुळे हा अंदाज घेणे थोडे कठीण जाते. आणि सामान्य म्हणून त्या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्याने अखेर ते जीवावर बेतत.

सायलेंट हार्ट अटॅकची लक्षणे कशी असतात?

सायलेंट हार्ट अटॅकमध्ये, तुम्हाला अचानक खूप थकवा जाणवू शकतो, ज्यामुळे तुमच्या दैनंदिन कामांवर परिणाम होऊ शकतो.

सायलेंट हार्ट अटॅक आल्यास, तुम्हाला थोडासा दबाव जाणवू शकतो, जो सहसा गॅस, आम्लता किंवा स्नायू दुखणे आहे असं समजला जातो.

सायलेंट हार्ट अटॅक आल्यास अचानक चक्कर येणे आणि घाम येणे यासारखी लक्षणे देखील दिसू शकतात.

त्यामुळे अशी काही लक्षणे दिसली तर त्याकडे सामान्य म्हणून दुर्लक्ष न करता ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क करा.

सायलेंट हार्ट अटॅक टाळण्यासाठी उपाय

हे टाळण्यासाठी, आहारात काही महत्त्वाचे बदल केले पाहिजेत. आहारात हिरव्या भाज्या आणि ओमेगा-3 असलेले पदार्थ समाविष्ट करा आणि मीठ आणि तेलकट पदार्थांचे सेवन कमी केला पाहिजे.

दिवसातून किमान 30 मिनिटे व्यायाम केल्याने तुम्हाला सायलेंट हार्ट अटॅकसारख्या गंभीर धोक्यांपासून संरक्षण मिळू शकते. तुम्ही चालणे, स्ट्रेचिंग, प्राणायाम आणि योगासारखे व्यायाम करू शकता.

धूम्रपान आणि मद्यपान पूर्णपणे थांबवा, कारण या दोन्ही गोष्टींमुळे हृदयविकाराचा धोका वाढतो.

**महत्त्वाची टीप: जर तुम्हाला सायलेंट हार्ट अटॅकची कोणतीही लक्षणे दिसली तर त्याकडे दुर्लक्ष करू नका. त्याऐवजी, ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क करा. तसेच कोणताही फिटनेस प्रोग्राम सुरू करण्यापूर्वी किंवा तुमच्या आहारात कोणतेही बदल करण्यापूर्वी तुमच्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.**

# मॉडर्न एज्युकेशन सोसायटी संचलित माध्यमिक विद्यालय अशोक नगर




दिनांक 15 ऑक्टोंबर रोजी मॉडर्न माध्यमिक विद्यालय, अशोक नगर शाळेत वाचन प्रेरणा दिन व जागतिक अंध दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. भारताचे माजी राष्ट्रपती व जनतेचे शास्त्रज्ञ म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती “वाचन प्रेरणा” दिवस म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात शाळेचे मुख्याध्यापक माननीय डॉ.अनिल माळी यांनी ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला विद्यार्थी सहभाग घेऊन पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

मॉडर्न माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक डॉक्टर अनिल माळी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती व वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात व प्रेरणादायी वातावरणात साजरा झाला. कार्यक्रम यशस्वीतीसाठी श्री. चंदर मिरके सौ. तेजश्री विधाते, सौ. श्वेता दिंडे यांनी परिश्रम घेतले. यावेळी माध्यमिक विभागाचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .

# लोक गौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद् तर्फे राष्ट्रीय एकता सन्मान महासोहळा सपन्न.

लोक गौरव राष्ट्रीय एकात्मता परिषद आणि एम.व्ही.एस यांच्या संयुक्त विद्यमाने ६ व्या वर्धापन दिनानिमित्त साहित्य मंदीर, वाशी, येथे आयोजित करण्यात आलेला ङ्ग राष्ट्रीय एकता सन्मान महासोहळाङ्ख नुकताच मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

एन.डी.खान यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या सदर पुरस्कार सोहळ्याच्या संयोजिका सौ.सलमा खान होत्या.लेफ्टंट कमांडर निलेश झोपे, महाराष्ट्राचे ख्यातनाम गझलकार ए.के.शेख, प्रसिद्ध अभिनेत्री आदिती सारंगधर, कस्टम व सेन्ट्रल एक्साईज चे माजी आयुक्त सुधाकर पाटील, जेष्ठ समाजसेविका उषा दत्त, सहाय्यक पोलीस आयुक्त रामचंद्र नागरगोजे, शिवाजीराव एस.जोंधळे विधी व संशोधन महाविद्यालय आसनगाव च्या प्राचार्या डॉ.पौर्णिमा सूर्वे,सिने दिग्दर्शक अल्ताफ शेख, अभिनेत्री उर्मिला डांगे आणि चित्रपट कलाकार कु. केतकी गावडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.विविध क्षेत्रात उल्लेखनीय व अनमोल कार्य करणाऱ्या सेवाव्रतींचा मान्यवरांच्या




हस्ते राष्ट्रीय प्राऊड लिडरशिप आयकॉन पुरस्कार व राज्यस्तरीय लोकसेवा गौरव पुरस्कार आणि सन्मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.यावेळी गझल क्षेत्रातील अतुलनीय योगदानाबद्दल ए.के. शेख सरांनाङ्ग जीवनगौरवङ्ख पुरस्कार प्रदान करण्यात आला.सर्व पुरस्कार्थींनी बांधलेला फेटा हे कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले.

याप्रसंगी टी.एम.जी.क्रीयेशन. व स्वरसंस्कार संगीत विद्यालय प्रस्तुत हिंदी व मराठी गाण्यांचा ङ्ग सूरबालगंधर्व सुरेल मैफलङ्ख या कार्यक्रमात स्वरसंस्काराच्या बाल कलाकारांनी सादर केलेल्या एकापेक्षा एक सादर केलेल्या मराठी आणि हिंदी गीतांना उपस्थितांनी टाळ्यांनी दाद दिली.

सदर पुरस्कार दरम्यान डॉ.विजय मोरे आणि सौ.विद्या डोंबे यांनी सादर केलेले हिंदी गीत सुध्दा रसिकांना भावले.त्याचप्रमाणे शब्दश्री विलास देवळेकर यांनी इकोच्या स्वरात सादर केलेली कवितेने उपस्थितांना हसण्यास भाग पाडले.

पुरस्कार सोहळ्याचे सूत्रसंचालन पल्लवी वढवेकर – बर्वे आणि दिपक कदम यांनी उत्कृष्टपणे केले .तर संगीतमय कार्यक्रमाचे अप्रतिम निवेदन कु.देवश्री घोडके आणि कु.स्वरा घरत यांनी केले.

सदरहु भव्य पुरस्कार सोहळा यशस्वी करण्यासाठी राजकुमार ताकमोगे, विलास देवळेकर,फीरोज पटेल,डॉ.श्रेयशी गोंडाबे, सौ.मीना ताकमोगै,सौ.स्नेहा चांदोरकर, डॉ.ईसा शेख, विजय भोसले, प्रतिभा किर्ती कर्वे, नंदिनी सुकाळे, डॉ.शेलेंद्र पवार, डॉ.विजय मोरे, गुलाब सलाट यांनी परीश्रम घेतले.

# पारंबी विद्यालयात वाचन प्रेरणा दिवस उत्साहात संपन्न









नवीन माध्यमिक विद्यालय पारंबी तालुका मुक्ताईनगर येथे भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिन 15 ऑक्टोबर 2025 रोजी विद्यालयात वाचन प्रेरणा दिवस म्हणून विद्यार्थ्यांसह उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला. डॉ.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी प्रतिनिधींनी पुष्पहार अर्पण करून पूजन करून वंदन करण्यात प्रसंगी डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याविषयी सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख तथा विद्यालयाचे ज्येष्ठ शिक्षक डॉ.शिवचरण उज्जैनकर त्याप्रमाणे विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक व शिक्षक श्री संतोष ठाकूर सर व शिक्षक श्री रोहन आठवले यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

प्रसंगी विद्यालयाचे सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख तथा ज्येष्ठ शिक्षक डॉ. शिवचरण उज्जैनकर यांनी इयत्ता दहावीच्या 41 विद्यार्थ्यांना थोर राष्ट्रसंत, थोर हुतात्मे, थोर वैज्ञानिक, थोर राष्ट्रीय नेते यांचे चरित्र पुस्तक पंधरा दिवसासाठी वाचनासाठी देण्यात आले यापूर्वी इयत्ता आठवीच्या आणि इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांना सुद्धा हि पुस्तक पंधरा दिवस वाचण्यासाठी दिली होती. आज वाचन प्रेरणा दिनानिमित्त इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना ही पुस्तक दिवाळीच्या सुट्टीमध्ये वाचण्यासाठी देण्यात आली.

# तितिक्षा कला साहित्य संमेलन संपन्न.तितिक्षा कला साहित्य संमेलन संपन्न अनेकानेक मान्यवरांच्या उपस्थितीत, थाटामाटात संपन्न झाले.

मा. उज्वलाताई पिंगळे, निवृत्त एसिपी,मा. राजलक्ष्मी शिवणकर, डि.सि.पी,पोलिस उपायुक्त,पुणे शहर,मा. प्रा. मुक्ता गरसोळे,सोनोपंत दांडेकर,अध्यासन केंद्र अध्यक्षा,उद्घाटक ....प्रमोद सूर्यवंशी( कलाकार), स्वागताध्यक्ष .. सुजित कदम (लेखक व प्रसिद्ध कवी ) ,मा.सुनिल जोशी.,मा. लक्ष्मण शिंदे ,मा. निलेश दातार ,मा. विठ्ठल मूरकेवार ,मा. प्रा. शरदचंद्र काकडे देशमुख आणि सोल्युशन माईंड श्री.सुजीत दातार . यांच्या उपस्थितीने सोहळा रंगतदार ठरला.

विमलाबाई माळी ,मीरा कवटीकवार API,विजया शिंदे, अनिता काळे , विजयमाला पवार सि.पी.आय्. , मेधा बांभोरीकर, सुरेखा वाडकर, लीना पांडे, मृणाल जैन .. यांना तितिक्षा नवदुर्गा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.





येऊ घातलेल्या रंगभूमी दिनाचे औचित्य साधून त्यानिमित्ताने क्षमा वैद्य ,जयमाला इनामदार आशा तारे ,उषा देशपांडे , राजश्री आठवले, मंजुषा जोशी साधना जोशी ,अंजली पटवर्धन मुक्ता पटवर्धन ,चित्रा साठे आणि रजनी भट या कलाकारांचा यथोचित सन्मान करण्यात आला. त्यांचा जीवनप्रवास या निमित्ताने अनुभवता आला. दशकपूर्ती निमित्ताने गणेशोत्सव काळात काव्यलेखन स्पर्धा घेण्यात आली होती. या स्पर्धेचे वैशिष्ट्यं म्हणजे सलग दहा दिवस दहा वेगवेगळ्या विषयावर अर्थात गणेशाशी संबंधितच.. निरनिराळ्या काव्य प्रकारात काव्य लेखन करायचे होते. त्या निमित्ताने गणेशा विषयी माहिती कळली व वाचनात आली. आणि या स्पर्धेचे परीक्षण ही अत्यंत पारदर्शक पद्धतीने मान्यवर परीक्षकांकडून झाले असल्याने अत्यंत मौल्यवान मार्गदर्शन ही लाभले. या गणेशोत्सव काव्य लेखन स्पर्धा २०२५ चा मान्यवरांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

असा हा सुंदर... नियोजनबद्ध.. .कल्पना वैविध्य..नाविन्य अशा वैशिष्ट्यपूर्ण संकल्पनांनी रंगलेला अविस्मरणीय सोहळा.या सोहळ्यासाठी अगदी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून सारस्वतांनी उपस्थिती नोंदविली व त्यामुळे हा सोहळा अतिशय रंगतदार झाला. बहारदार सूत्रसंचालन प्रिया प्रमोद दामले आणि सुवर्णा जाधव यांनी केले. मा. विनोद जैन यांनी आपल्या सुमधूर चविष्ट भोजनाने सर्वांची मने जिंकली . मा. गौरव पुंडे यांचे विशेष सहकार्य लाभले. अजया...अजिता.,निलेश शिर्के आणि तितिक्षा परिवार यांनी या दिमाखदार सोहळ्याचे संयोजन केले.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर

शुक्रवार १७ ऑक्टोबर २०२५
https://lokaarambh.com



# राज्यावर संकट! 15 जिल्ह्यांमध्ये अलर्ट, पुढील 24 तास धोक्याची, प्रशासनाचा मोठा इशारा

काही दिवसांपूर्वी राज्यात पाऊस झोडपताना दिसला. अनेक भागात मोठी अतिवृष्टी झाली आणि शेतकऱ्यांचे हाताशी आलेले पिक वाहून गेले. विशेष: मराठवाड्यात या पावसाचा मोठा फटका बसल्याचे बघायला मिळाले. मॉन्सून राज्यातून गेल्याचे सांगितले जात असतानाच आता पुन्हा एकदा राज्यात पावसाला पोषक वातावरण निर्माण झाले असून काल अनेक भागांमध्ये जोरदार वाऱ्यासह मुसळधार पावसाने हजेरी लावली. ठाणे, कोकण, मराठवाड्यातील काही भागात वादळी वाऱ्यासह पाऊस झाला. विजांचा कडकडाट देखील मोठ्या प्रमाणात बघायला मिळाला. आज देखील भारतीय हवामान विभागाने पावसाचा अत्यंत मोठा इशारा दिला आहे. दसरा जाऊन दिवाळी आली असतानाही अजूनही पाऊस कमी होण्याचे नाव घेत नाहीये. 15 जिल्ह्यांमध्ये पावसाचा इशारा देण्यात आलाय भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार, आज मध्य महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्यातील काही भागांमध्ये विजांच्या कडकडाटासह पाऊस होईल. अरबी समुद्रातील लक्षव्दीप बेटाजवळ समुद्र सपाटीपासून 5.8 उंचीवर वारे वाहत आहे. केरळ, कर्नाटक किनाऱ्यालगत कमी दाबाचा पट्टी निर्माण झाला. यामुळे राज्यातील काही भागात जोरदार पावसाची हजेरी बघायला मिळतंय. मराठवाड्यातील काही भागात, छत्रपती संभाजीनगर, रायगड, सिंधुदुर्ग, रत्नागिरी,



सातारा, पुणे, कोल्हापूर, जालना, सांगली या भागात पाऊस झाला. काल सायंकाली ठाणे जिल्हात अनेक भागांमध्ये वादळी वाऱ्यासह मोठा पाऊस झाला. अचानक झालेल्या पावसामुळे लोकांची चांगलीच तारांबळ उडाल्याचेही बघायला मिळाले. यावेळी मोठ्या प्रमाणात विजांचा कडकडाट देखील सुरू होता. भारतीय हवामान विभागाने 72 तासांसाठी पावसाचा अलर्ट दिला आहे. पश्चिम बंगालच्या खाडीमध्येही कमी दाबाचा पट्टा निर्माण होण्याचे संकेत आहेत. यामुळे हे स्पष्ट आहे की, राज्यातून मॉन्सून गेला असला तरीही पुढील काही दिवस राज्यात पावसाचे ढग कामयमच राहणार आहेत. 19 ऑंक्टोबरपर्यंत राज्यात पाऊस असणार आहे. या पावसाचा अधिक प्रभाव कोकण किनारपट्टी भागात जाणवणार आहे. किनारपट्टी भागात विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता असणार आहे. पावसाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना सर्तक राहण्याचा इशारा दिला आहे. 15 जिल्हांना पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया च्या बीड शहर अध्यक्ष पदी निसार शेख

बीड, प्रतिनिधी

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) च्या बीड जिल्हा संघटनेत नवीन संघटनात्मक बदल करण्यात आला असून, पक्षाच्या वतीने निसार शेख यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) बीड शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.या बाबतचे नियुक्तीपत्र 16 ऑक्टोबर 2025 रोजी जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड यांनी यांच्या हस्ते देण्यात आले आहे. राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात साहेब यांच्या विचारधारेनुसार समाजातील वंचित, शोषित, पीडित, बहुजन समाज व घटक यांना न्याय मिळवून देण्यासाठी पक्षाचे कार्य अधिक बळकट करण्याचा संकल्प या नियुक्तीद्वारे व्यक्त करण्यात आला आहे. निसार शेख यांनी आणि राजकीय क्षेत्रात कार्य करताना बहुजन समाजाच्या हक्कांसाठी लढा देण्याचे



आवाहन करण्यात आले आहे. तसेच, शहर, तालुका आणि ग्रामपातळीवर पक्षाची संघटना मजबूत करण्याचे निर्देशही दिले आहेत. जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड यांनी पत्रात म्हटले आहे की, “जनसमस्यांवर मात करण्यासाठी आणि सामाजिक न्यायासाठी निसार शेख यांचे योगदान महत्त्वाचे ठरेल. पक्षाच्या धोरणानुसार कार्य करावे, समाजात पक्षाची भूमिका प्रभावीपणे मांडावी आणि सोशल मीडियावरही पक्षाच्या भूमिकेचे प्रतिनिधित्व करावे,” असे निर्देश दिले आहेत. ही नियुक्ती एक वर्षासाठी वैध असून, पक्षाकडून दिलेल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. पक्षाच्या नियुक्तीमुळे बीड शहरातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, नव्याने निवड झालेल्या शहराध्यक्ष निसार शेख यांनी “दलित, वंचित आणि बहुजन समाजाच्या प्रश्नांवर लढा देत रिपब्लिकन चळवळ मजबूत करण्याचा संकल्प” व्यक्त केला आहे. निसार शेख गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक राजकीय कार्यात सहभागी असल्याने त्यांनी चळवळीत स्वतःला झोकून दिले आहे त्यांच्या माध्यमातून समाजाच्या अनेक प्रश्नांवर नेहमी आवाज उठवला जातो व न्याय मिळवून दिला जातो त्यांचा जनसंपर्क देखील दांडगा असून याचा नक्कीच फायदा पक्षाला होईल निसार यांच्या सारख्या प्रामाणिक कार्यकर्त्याला रिपब्लिकन पक्षाने संधी दिल्याने चळवळीतल्या कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्वच क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे

## गांधी बाल मंदिर मध्ये दीपोत्सव ,आकाश कंदील बनवणे मोहीम..




गांधी बाल मंदिर मध्ये विद्यार्थ्यांच्या सुरजनशीलतेला वाव मिळावा, पर्यावरणा विषयी जनजागृती व्हावी स्वतःच्या कृतीचा आनंद घ्यावा या दृष्टीने दीपावली निमित्त आनंद उत्सव व पर्यावरण पूरक असे आकाश कंदील बनवण्याची मोहीम हाती घेण्यात आली यामध्ये शाळेचे शिक्षक श्री रत्नकांत विचारे सर श्री.विश्वनाथ पांचाळ सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून आपल्या या कृतीचा आनंद घेण्यास प्रोत्साहन दिले . या मध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री अनिल पांचाळ सर सहभागी होऊन प्रोत्साहन देत होते .सदर कार्यक्रमात शाळेच्या शिक्षिका अर्चना जाधव मॅडम ही सहभागी झाल्या होत्या.

## अवैध वाळू वाहतूक करणारा टिप्पर पोलिसांच्या ताब्यात



बीड, दि. १६ ऑक्टोबर आज रोजी बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परवर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. पोलिसांनी एका टिप्परमधून तब्बल पाच ब्रास इतकी वाळू जप्त केली असून या कारवाईत एकूण २५ लाख २५ हजार किमतीचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.सदर टिप्पर चालकाचे नाव शिराज सालार शेख (वय ३५ वर्षे, रा. तैयब नगर, गेवराई) असे असून, वाहनाचा मालक विपुल मस्के (रा. पालवण, ता. जि. बीड) असा आहे. या दोघांविरुद्ध बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर ,उपनिरीक्षक श्रीराम खटावकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार विकास राठोड, पोलीस अंमलदार अश्फाक सय्यद, मनोज परजणे व नितीन वडमारे यांनी केली.

## क्षीरसागर मुक्त नगरपालिका करणार – नवनाथ अण्णा शिराळे
## बीड नं. प. नगराध्यक्ष भाजपचा असेल

बीड प्रतिनिधी. बीड शहरामध्ये सध्या नगरपालिकेचे राजकारण तापत असून याच पार्श्वभूमीवर गेल्या 35 वर्षांमध्ये क्षीरसागर यांनी बीड शहराचा कुठला विकास न करता बीड जिल्हा सर्व भकास केलेला आहे.कारण बीड शहराला पाणीदेखील देण्यामध्ये क्षीरसागर कमी पडले आहेत.पंधरा ते वीस दिवसाला बीड शहरवासी यांना पाणी मिळते ते देखील अशुद्ध पाणी काही ठिकाणी पाण्यामध्ये कुत्रे मेलेले आढळतात. यामुळे माणसाचे आरोग देखील धोक्यात आलेले आहे. याच अनुषंगाने बीड शहरातील बीड परिसरातील सर्व नागरिक नाराज असल्यामुळे त्यांना आता ही नगरपालिका निवडणूक लढवण्याचा कुठलाच नैतिकतेचा अधिकार क्षीरसागर यांना नसल्याचे भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ आण्णा शिरोळे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाच्या माध्यमातून सर्व बीड शहरातील जनतेला आवाहन केले आहे की,आपण बीड शहराला भकास करणाऱ्या लोकांना कुठलेच मतदान रुपी आशीर्वाद देऊ नका.त्यांना दारातही उभे करू नका. त्यांना कुठलाच थारा देऊ नका. आणि क्षीरसागर यांना त्याची जागा दाखवा. असे आव्हान देखील नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी सर्व बीड शहरातील तमाम मतदार बंधू आणि भगिनी यांना केले आहे. तसेच भारतीय जनता पार्टीच्या नेत्या तथा महाराष्ट्राच्या मंत्री आदरणीय पंकजाताई मुंडे व माजी खासदार प्रीतम ताई मुंडे या भगिनी ज्या उमेदवार देतील तो उमेदवार आम्ही मोठ्या ताकतीने निवडून आणू आणि बीड नगरपालिका सर्व ताकद लावून क्षीरसागर मुक्त करु व सर्व बीड शहरातील जनतेची सेवा भारतीय जनता पार्टीने दिलेला नगर अध्यक्षपदाचा उमेदवार निवडून आणून व सर्व नगरसेवक निवडून आणून द्या अशी विनंती देखील केली आहे. हे येणाऱ्या भविष्यकाळात बीड शहरातील सर्व नागरिकांची सेवा करतील असे असे मनोगत नवनाथ अण्णा शिराळे यांनी दिलेल्या प्रसिद्धी माध्यमाशी बोलताना थोडक्यात विचार व्यक्त केले. आता पंकजाताई यांच्या आदेशाची आम्ही वाट पाहत आहोत की ताई कोणता उमेदवार देतात तो



उमेदवार आम्ही पूर्ण ताकतीने निवडून आणणार व बीड नगरपालिका ही कायमची शिरसागर मुक्त करणार आणि भकास झालेला बीड जिल्हा विकासाच्या वाटेवर आणू असे विचार देखील व्यक्त केले.

# नगरपरिषद निवडणूक ही आपल्यासाठी नवी नाही. परिस्थिती काहीही असो, शहरातील जनता आपल्या सोबत उभी आहे-डॉ.योगेश क्षीरसागर

बीड (प्रतिनिधी) दि.१६ : नगरपरिषदेचे अध्यक्षपद अनुसूचित जातीतील महिलेसाठी आरक्षित असल्याने आता नव्या महिला नेतृत्वाला संधी मिळणार आहे. ज्यांना पूर्वी संधी मिळाली नाही, त्यांचाही विचार केला जाईल. तसेच, ५० टक्के प्रतिनिधित्व तरुणांना दिले जाईल. गेली ३० वर्ष बीडकरांनी डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवला आहे. ही विजयाची परंपरा पुढेही कायम राहणार आहे, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे. आगामी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत बीडमध्ये सौ.के.एस.के. महाविद्यालयाच्या सभागृहात गुरुवारी (दि.१६) बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, माजी नगरसेवक किशोर काळे, गणेश वाघमारे, भास्कर जाधव, नरसिंग नाईकवाडे, शिवाजी



जाधव, संजय होळकर, शुभम धूत, अशोक वाघमारे, विकास जोगदंड, प्रकाश कानगावकर, प्रेम चांदणे, रवी जवेरी, राहुल गुरखुदे, बाळासाहेब जाधव, सुभाष सपकाळ, संगीता वाघमारे, शालिनी परदेशी, मुस्तफा भाई, नशीर अन्सारी, बाळासाहेब आंबेकर, महेश गर्जे, अमोल पवळ, साउद भाई, सतीश पवार, नबील जमा, बाळासाहेब गुंजाळ, दत्ता जाधव, संभाजी दुधाळ, रवींद्र कदम, जुनेद जहागिरदार, अशोक शेजवळ, बाबू अत्तार, मुजीब एवन, गुड्डू चाऊस, बिलाल, असरार, पिंटू माने, खमर, द्वारकादास फटाले यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, नगरपरिषद निवडणूक ही आपल्यासाठी नवी नाही. परिस्थिती काहीही असो, शहरातील जनता आपल्या सोबत उभी आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. जिल्ह्याचे मुख्यालय असलेल्या बीड नगरपरिषद निवडणुकीत मी माझ्या विधानसभा निवडणुकीपेक्षा अधिक ताकद लावणार आहे. कायम निष्ठेने सोबत असलेल्या कार्यकर्त्यांनाच पक्षाकडून संधी दिली जाणार आहे. परंतु आपण उभे केलेले काही लोक आज पक्षातील नेत्यांकडेच आपली तक्रार करत आहेत, ही खेदजनक बाब आहे. प्रत्येकाने आपापले घर मजबूत करावे, इतरांकडे पाहू नये. ज्यांना आजपर्यंत स्वतःची नगरपरिषद ताब्यात घेता आली नाही, ते बीडमध्ये येऊन काय करणार? असा टोला त्यांनी लगावला. ते पुढे म्हणाले, नव्या-जुन्या कार्यकर्त्यांची सांगड घालून आपण निवडणुकीला सामोरे जाणार आहोत. अजितदादांनी बीड शहरासाठी सर्वाधिक निधी दिला आहे. सीट्रिपलआयटी, शासकीय इमारती, नदी सुशोभीकरण, डीपी रस्ते यांसारखे महत्वाचे विकास प्रकल्प हाती घेतले आहेत. अनेक प्रस्तावांवर बसून चर्चा करून निधी मिळवला, परंतु त्याचे श्रेय आमदार घेत आहेत. आमदारांचा फंड नेमका कुठे गेला याबाबत मात्र कोणी बोलत नाही. माजी आमदारांच्या कामांचे बोर्ड दिसतात; मात्र निधी कोणत्या कामावर खर्च झाला याचा हिशोब कोणी देत नाही, असेही त्यांनी नमूद केले. बीडच्या विकासासाठी नगरपरिषद निवडणूक आपल्या ताब्यात येणे आवश्यक आहे. गेल्या तीन ते साडेतीन दशकांत मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. मात्र लोकसंख्या व क्षेत्रफळ वाढल्याने शहराच्या हद्दीबाहेरील भागात विकासकामे अद्याप अपूर्ण आहेत, असेही ते म्हणाले. या बैठकीत अनेकांनी मनोगत व्यक्त केले. तसेच, आगामी निवडणुकीची रणनीती, संभाव्य उमेदवारांबाबत प्राथमिक चर्चा झाली. नगरपरिषद निवडणूक नियोजनबद्ध पद्धतीने लढविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

### कार्यकर्त्यांसाठी पूर्ण ताकदीने निवडणूक लढविणार :डॉ.सारिकाताई क्षीरसागर

डॉ.सारिकाताई क्षीरसागर मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या, डॉ.योगेश क्षीरसागर हे सर्वसमावेशक नेतृत्व आहे. त्यांचा शांत स्वभाव आहे, याचा अर्थ आम्ही कमजोर नाहीत. डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी बीड शहराचा विकास केला आहे. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून डॉ.योगेश हे राजकारणात पुढे जात आहेत. त्यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन सोबत असलेल्या निष्ठावंत, विकासाभिमुख उमेदवारांना नगरपरिषदेत संधी दिली जाणार आहे. आता महिलांनी नेतृत्व करण्यासाठी सज्ज रहावे. आम्ही निवडणूक लढविणार की नाही, याबाबत निर्णय नाही. परंतु कार्यकर्त्यांसाठी मात्र पूर्ण ताकदीने निवडणूक लढविणार आहोत. शहरात वॉर्ड ५२ की ५० हे विरोधकांना ठाऊक नाही. त्यांनी शहरात नेमका विकास कुठे केला? हे दाखवून द्यावे, असा टोला विरोधकांना लगावला.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com